R.P.A.D.

क्रमांक:जमीन-२६९०/२२८३८२/प्र.क्र.२०७०/ज३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २७ डिसेंबर, १९९०

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
न.भू.क्र.८२५ मौ. मालाड ता. बोरीवली
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस
विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी जमीन
मिळणेबाबत....

वाचन:-
=====

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांना त्यांच्या क्र.८७/३८/ई-२४, दिनांक ८.८.१९९० च्या वरील विषयाच्या पत्राच्या अनुषंगाने विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस [बीत प्रगती मित्र मंडळ] नरसोपावाडी, मौजे मालाड [पूर्व] येथील गलिच्छ वस्तीतील रहिवाश्यांना विद्युत पुरवठा करण्याकरिता विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी मौजे मालाड येथील न.भू.क्र.८२५ मधील २० फूट x २० फूट=४०० चौ.फू. [३७.२० चौ.मी.] जमीन त्या जमिनीच्या प्रति चौ.मी. रु.५००/- प्रमाणे होणाऱ्या रकमेच्या ८% इतके तात्पुरते वार्षिक भाडे आकारून १० वर्षांच्या भाडेपट्ट्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ मधील तरतुदींनुसार व याबाबत जिल्हाधिकाऱ्यांस योग्य वाटतील अशा अन्य अटी आणि पुढील अतिरिक्त अटीवर देण्यास शासन मंजुरी देत आहे:-

१] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने तात्पुरती भाडेपट्ट्याची रक्कम व शासन अंतिमरित्या ठरविल त्या दराने भाडेपट्ट्याची रक्कम यामधील फरकाची रक्कम विहीत व्याजासह भरण्यास तयार असल्याचे लेखी मुद्रांकित हमीपत्र द्यावे.

२] मुंबई विद्युत पुरवठा कंपनीने शासनाच्या धोरणाप्रमाणे फक्त गणना झालेल्या झोपडपट्टीधारकांनाच विद्युत जोडणी द्यावी.

३] मुंबई विद्युत पुरवठा कंपनीने, यंत्रांना लागणाऱ्या पाया व्यतिरिक्त केलेले इतर सर्व बांधकाम अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे असेल.

६४३८८

....२/-

OFFICE OF THE

Scanned by CamScanner

२. हे आदेश, नगर विकास विभाग व शासन आदेश, वित्त विभाग, क्र. ओसीओ-१०७७/१६८/सेवा-२, दिनांक ..७.७७ अनुसार या विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

३. लेखा प्रदर्शनाची ४ प्रतिका सोबत जोडण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[स.दे.आकर्णीकर]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

सोबत:-४ प्रतिका

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा
[मुंबई, नै.के.आर.डी.के. बिल्डींग, बांद्रा(पूर्व)]
मुंबई-४०००५१

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-
१. आयुक्त, रोजगार विभाग, रोजगार भवन, नवी मुंबई.
२) कमांडंट आयुक्त व संचालक कृषी ऑफिस, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, कृषी ऑफिस, रोजगार ठेवा, ओवाई इस्टेट, मुंबई.
४) महालेखापाल, [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. वित्त विभाग [सेवा-२] मंत्रालय, मुंबई.
७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, [निवड नस्ती] मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

३) मुंबई विद्युत पुरवठा कंपनीने शासनाचे धोरणानुसार फक्त नमना झालेल्या

झोपडीधारकांनाच विद्युत जोडणी द्यावी.

४) मुंबई विद्युत पुरवठा कंपनीने त्यांना लागणा-या बाधा व्यतिरिक्त कोई

इतर सर्व बांधकाम अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे असावे.

५) मुंबई विद्युत पुरवठा कंपनीने सदर जमिनीचा उपयोग ज्या कारणाकरिता

देण्यात आली आहे त्याच कारणाकरिता करावा.

६) प्रश्नाधिन जमिन किंवा तिचा कोणताही भाग शासनाचे लेखी पूर्व

संमतीशिवाय विक्री, भोगवटा, वा गहाण टाकू नये.

७) शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरिता

प्रश्नांकित जमिनीची आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी त्याबाबतीत पट्टेदाराला

एका महिन्याची लेखी नोटीस देवुन हा पट्टा कोणत्याही वेळी रद्द करु शकतील.

८) उक्त पट्टा समाप्त झाल्याच्या बद्दल पट्टेदाराला कोणत्याही

नुकसानभरपाईदाखल दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही, व उक्त तुकडा ज्या स्थितीत

होता त्या स्थितीत त्याचा कब्जा तो जिल्हाधिका-यांच्या स्वाधिन करील.

९) उक्त अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू पट्टा

रद्द झाल्याचे समजण्यात येवुन प्रश्नांकित जमिन सरकार जमा करण्यात येईल.

प्रश्नांकित जमिनीचा ताबा कंपनीने नगर भुमापन अधिकारी क्र.५

जोगेश्वरी यांचेकडून घ्यावा. सत्पूर्वी वार्षिक भाडेपट्टयाची तात्पुरती रक्कम

रुपये १५०५=१५ तहसिलदार बोरीवली यांचेकडे कार्यालयात जमा करावी.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

(सही) ३/११/८९

मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कं.लि.
पोष्ट बॉ नं.६८०८, इलेक्ट्रीसीटी हाऊस,
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रत:- नगर भुमापन अधिकारी क्रमांक ५ रहिवाया मंजिल जोगेश्वरी एस.व्ही.रोड, जोगेश्वरी (प.) मुंबई ४०० ०६७ यांचेकडे माहिती व जरुर त्या कार्यवाहीकरिता रवाना.

२/- सोबतच्या नकाशात दर्शविण्यात आलेली न.भू.क्र.८२५ पै.एका बाजुची २० फुट x २० फुट जमिनीचा ताबा कंपनीस देवुन ताबा पावतीच्या व नकाशाच्या तीन तीन प्रतीसह पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच मिळकत पत्रिकेच्या उता-यात जरुर ती नोंद घेवुन त्याच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

प्रत:- तहसिलदार बोरीवली यांचेकडे माहिती व जरुर त्या कार्यवाही करीता रवाना.

प्रत:-मा.सचिव, महसुल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरिता सविनय सादर.



Scanned by CamScanner